# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,

राहुरी. जि.- अहमदनगर ४१३ ७२२

फोनः-०२४२६-२४३२२६ ई-मेलः- comptroller.mpkv@gov.in

नियंत्रक

जा.क्र. नियंत्रक/जीएसटी/४३७/२०१८
दि.१०/१०/२०१८

**महत्वाचे**

## परिपत्रक

**विषय :- वस्तु व सेवा कराच्या (GST) TDS कपातीबाबत...**

**संदर्भ :-१.महाराष्ट्र वस्तु व सेवा कर कायद्याअंतर्गत अधिसूचना क्रमांक ५०/२०१८ राज्यकर दि.१९.०९.२०१८**

**२.रासआ/मुख्या.२/मवसेकका अंतर्गत टी डी एस/२०१८-१९/ब-८३६ दि.१९.०९.२०१८**

**३. जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/लेखा-२/GST/नोंदणी/१००१/२०१७ दि.३०.१२.२०१७**

(अ) उपरोक्त संदर्भीय परिपत्रकामध्ये नमुद केल्यानुसार वस्तु व सेवा कर कायदा, कलम ५१ मधील विविध तरतुदीन्वये विद्यापीठातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना "वजातदार" (Deductor) असे संबोधले जाईल आणि जो पुरवठादार माल अथवा सेवा यांचा पुरवठा करील त्यांना "वजाती" (Deductee) असे संबोधले जाईल.

या कायद्याच्या, कलम २४ (६) नुसार, वजातदाराला नोंदणी अनिवार्य केली आहे. अशी नोंदणी दि.१६/१०/२०१८ पूर्वी करणे आवश्यक आहे. यासाठी या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मफुकृवि /नियंत्रक/लेखा-२/GST/नोंदणी/१००१/२०१७ दि.३०/१२/२०१७ नुसार मे. किशोर डी. भोंगळ ॲण्ड असोसिएटस, राहुरी यांची नोंदणी करुन देणेस्तव नियुक्ती केली आहे. त्यांचेकडून अथवा अन्य स्थानिक कर सल्लागार यांचे कडून रु ५००/- पर्यंतचे मोबदल्यात शुल्कापर्यंत नोंदणी करुन घ्यावी.

(ब) (i) दिनांक ०१/१०/२०१८ पासून ज्या वस्तु व सेवा पुरवठ्याचे एका संविदेखालील (Contract/Agreement/Work order) मूल्य दोन लाख पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक असेल, अशा ठेकेदार/पुवठादारास प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेतून वजातदाराने दोन टक्के [ १% राज्य कर (SGST) आणि १% केंद्रीय कर (CGST)] दराने करकपात करावी.

(ii) कंत्राटदाराने/ठेकेदाराने/ पुरवठादाराने देयकामध्ये स्वतंत्रपणे वरीलप्रमाणे वजावट दर्शविली नसेल तरी सुध्दा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करांची कपात करणे आवश्यक आहे. असे देयक पारीत करतांना अति.अधिदान व लेखा अधिकारी / अधिदान व लेखा अधिकारी यांनी उचित वजावटीची

खात्री करुन कंत्राटदार/ठेकेदार/पुरवठादार निहाय शासकीय व इतर वजावटींचे धनादेश सोबतच्या नमुन्यातील विवरणासह आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी द्यावेत. आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्या सर्व वजावटी विहीत चलनांद्वारे मुदतीत भरणा करावयात.

(iii) आहरण व संवितरण अधिकाऱ्याने GST म्हणून कपात केलेली रक्कम, ज्या महिन्यात अशी कपात केली असेल, त्या महिन्याच्या समाप्तीनंतर पुढील १० दिवसांच्या आत GST Portal वरील विहीत प्रक्रियेद्वारे बँकेमार्फत शासनाच्या खात्यात भरणा करावी.

(iv) वजातदाराने कपात केलेली रक्कम GST Portal द्वारे भरणा केल्यानंतर लागलीच ५ दिवसांमध्ये वजाती (Deductee) ला जिएसटीआर-०७ए च्या नमुन्यात विहीत टी.डी.एस. प्रमाणपत्र द्यावे.

वरील कार्यवाहीसाठी वस्तु व सेवा कर कायद्याअंतर्गत पारीत संदर्भ १ व २ चे शासन आदेश मार्गदर्शनास्तव सोबत जोडले आहेत.

(विजय कोते)
नियंत्रक
महात्मा फुले कृषि विद्यापीठ
राहुरी

प्रत माहितीस्तव :-

१. मा. संचालक विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
२. मा. अधिष्ठाता (कृषि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
३. मा. संचालक संशोधन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
४. मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तवः-

१. सर्व आहरण व संवितरण अधिकारी
२. अधिदान व लेखा अधिकारी राहुरी/पुणे/धुळे/कोल्हापूर

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, आपल्या विभागातील आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून GST कपातीबाबत कार्यवाही करावी.

## Abstract of Agency wise Government and other Deductions (Income Tax, GST)

(to be given by APAO/PAO to concern DDO on monthly basis)

| | |
|---|---|
| Name of Agency | |
| PAN Number | |
| GST Number | |
| Deduction Period | |

| | |
|---|---|
| Name of Concern DDO | |

### Deduction Statement

| Sr. No. | DDO Bill No. | Vr. No. | Gross | Income Tax | Royalty | Labour Cess | Water Charges | Labour Insurance | GST (CGST + SGST) | Security Deposit | Net |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | | | |
| **Total** | | | | | | | | | | | |
| Cheque No / Date | | | | | | | | | | | |
| Payable to | | | | Yourself for Income Tax | Yourself for Royalty | Maharashtra State Welfare Board | Comptroller, MPKV, Rahuri | Directorate of Insurance Maharashta State, Mumbai | Yourself for GST | Transfer Entry | |

सुचना :- वरील प्रमाणे धनादेशांवरील रकमांच्या तपशीलांवर बँकेप्रमाणे पारदर्शक चिकट टेप लावावा.

Attachment
10/10/18